## निवडक

### दिव्यांगांना मोफत उपकरण वितरणांकरता २२ मे रोजी काणकोणात शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १९** : काणकोण येथील रवींद्र भवनात गुरुवार दि. २२ रोजी सकाळी ९.३० वाजता अपंग व्यक्तींचे सक्षमीकरण तथा मूल्यांकन शिबिर गोवा सरकार, नियोजन आणि सांख्यिकी संचालनालय आणि भारत सरकार यांच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

गोवा व केंद्र सरकारच्या एडीआयपी योजनेअंतर्गत मदत आणि उपकरणे मोफत वितरणा- साठी पात्र दिव्यांगजनांची ओळख पटविण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात येईल. असे काणकोण भाजप कार्यालयातर्फे कळविण्यात आले आहे.

कार्यकर्त्यांनी, संबंधित ग्रामपंचायतीचे सरपंच, पंच सदस्य, अध्यक्ष आणि प्रभाग नगरसेवकांनी आप-आपल्या परिसरातील दिव्यांग व्यक्तींना शिबिराचा लाभ घेण्यासाठी व दिव्यांगासाठीची उपकरणे वितरणांवेळी उपस्थित राहावे. अशी सूचना सभापती आणि काणकोणचे आमदार यांच्या कार्यालयातर्फे करण्यात आली आहे.

---

### डिचोली येथील समर कॅम्पमध्ये ४० मुलांचा सहभाग

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १९** : येथील सरकारी तालुका ग्रंथालयात समर कॅम्प घेण्यात आला. हस्तकला या विषयावर आधारित विविध प्रकारच्या पुठ्ठ्यांच्या वस्तू कशा कराव्यात यांचे सुरेख मार्गदर्शन प्रशिक्षक मितेश गावकर यांनी करून विद्यार्थ्यांकडून मासा आंबा सनफ्लावर पल उंदीर मोर, जास्वंदी चमेली झाड घोडा अननस डाळींब यांच्या प्रतिकृती तयार करून घेतल्या जवळ जवळ ४० मुलांनी भाग घेतला होता. दुसऱ्या दिवशी सुलभ योगासन करून घेण्यात आली, ही योगासन एक शिक्षिका स्नुशा गावस यांनी मुलांना शिकवली या समर कॅम्प उद्‌घाटन समई प्रजवन करून डिचोली नगरपालिकेचे नगराध्यक्ष विजयकुमार परशुराम नाटेकर यांनी भाषणातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. ते प्रमुख पाहणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते, त्यांच्यासोबत गोव्यातील नामवंत कवी हार्मोनियम गायक वक्ते नारायण खोरजुवेकर त्यांनी चित्रकला याची माहिती दिली रंगाचा अर्थ सांगितला रंगाचा स्वभाव सांगितला. तर चित्रपट निर्माता दिग्दर्शक शिक्षक मितेश गावकर यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले ग्रंथालयाच्या ग्रंथपाल तेजा परब हीने प्रास्तावित केले परिचय मीरा भोसले ने केला त्या उन्हाळी शिबिरात सिद्धी भजे प्रतिमा आमोणकर, घनश्याम गावकर, ,कृष्णा गावस सारिका साखळकर सुरक्षा रक्षक नवनाथ गोसावी रामा माऊसकर यांची उपस्थिती होती अस्मिता भिडे यांनी आभार मानले.

---

### धारगळ दाड देवस्थानचा आज स्थापना सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १९** : दाडाचीवाडी येथील श्री दाड देवस्थान पुनः प्रती स्थापना सोहळा मंगळवार दि. २० रोजी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे.

या निमित्त सकाळी पूजा, आरती, तीर्थप्रसाद दुपारी १ ते ३ पर्यंत महाप्रसाद व रात्री ८ वाजता जूनुटवाडा दाडाचीवाडीतर्फे कला चेतना वळवई निर्मित व राजदीप नायक प्रस्तुत २ अंकी कोंकणी नाटक 'गाव जाला जाणटो' हा कोकणी नाट्यप्रयोग होणार आहे.या नाटकात मोहनदास नायक, राजेश लोहिया, रामानंद नायक, निगम नायक, प्रशांती च्यारी, सुचिता नार्वेकर आणि राजदीप नायक हे कलाकार भाग घेतील.

तरी या नाट्य प्रयोगाला रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजकांतर्फे विजय कांबळी व देवस्थान समितीतर्फे अध्यक्ष निवृत्ती टेमकर यांनी कळविले आहे.

---

### नावेली फिडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १९** : ११ केव्ही नावेली फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. २० रोजी सकाळी ९ ते दुपारी २.00 वाजेपर्यंत शिरोडकर पसरो जवळील डोंग्री, एल अँड एल पर्ल, डोंगरी चॅपल, लिएंड्री, मॅट्रिक्स, रावणफोंड ते नावेली रस्ता आणि नावेली ग्रंथालय भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे उडपी हॉटेल ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २० रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत कुडतरकर क्लासिक आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### सेंट जोझफ स्कुल ट्रावासो ट्रान्सफोरमरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९** : सेंट जोझफ स्कुल ट्रावासो हाईट ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. २१ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत डीआयजी बंगलो,वाटीका सहकारी संस्था, सिलवर गेट आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे ११ केव्ही बाळ्ळी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. २१ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत व्हेल्यू व्हिव, नयाबांध पीड्ब्ल्युडी पंप, बाळ्ळीमठ, बाळ्ळी बाजार, बाळ्ळी न्यू वाडो आणि वोलातोडी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### दिवाडी फिडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९** : ११ केव्ही दिवाडी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. २० रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत मळार, बेलसुर, सांतारभाट, सिंकेरी, गांधी पार्क, आंबोय, दत्तवाडी आणि दिवाडी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही दिवाडी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. २१ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत सिंकेरी, दत्तवाडी, वितोजन, देवाया आणि दिवाडी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### पाळोळे फिडरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. १९** : ११ केव्ही पाळोळे फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २१ मे २०२५ रोजी सकाळी ९.00 ते संध्या ५.00 वाजेपर्यंत नगरपालिका कार्यालय, टेलिफोन एक्सचेंज, क्लियोपात्रा, गायतोंडेवाडा, ढवळीकर हॉस्पीटल, देवबाग, आईस फॅक्टरी, पाळोळे बीच, रिक्शा स्टॅन्ड, भूमीपुरूष, ओरे, सावंतवाडा, कोळंब, देवगीपुरूष, पाटणे, पाटणे बीच, कुपेवाडा, मारांगण, पणसुले, किंदळे, राजभाग, तारीर, नवोदय, मस्तीमळ आणि देळे भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### पर्वरी येथे उद्या दहशतवाद विरोधी दिवस

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९** : २१ मे २०२५ रोजी दहशतवाद विरोधी दिवस पाळण्यात येईल. यावेळी मुख्य सचिव, स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करतील आणि त्यानंतर सकाळी ११ वाजता पर्वरी येथील सचिवालयाच्या खुल्या जागेत दहशतवादविरोधी दिनाची प्रतिज्ञा देतील.

# एमडीआर रस्त्याविरोधात मांद्रे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी

## २५ मीटर रुंदीच्या मध्यम दर्जा रस्त्याला विरोधाची हाक २५ रोजी जाहीर सभा

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. १९** : आम्ही न्यायालयाच्या विरोधात नाही; मात्र सरकारने न्याय दिला पाहिजे, अशी ठाम भूमिका घेत मांद्रे मतदार संघातील नऊ पंचायत मंडळांनी प्रस्तावित २५ मीटर रुंदीच्या मध्यम दर्जा (एमडीआर) रस्त्याला विरोधाची हाक दिली आहे. या संदर्भात ग्रामस्थ व पंचायत प्रतिनिधींची एक जाहीर सभा २५ मे रोजी दुपारी हरमल (त. पेडणे) येथे आयोजित करण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने सू मोटो याचिकेत सर्व नगरपालिका व ग्रामपंचायतींना एमडीआर रस्त्यांच्या कडेला झालेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा अहवाल सादर करा, असा आदेश दिल्यापासून ग्रामीण भागात भीतीचे वातावरण आहे. रस्ता रुंदीकरण झाल्यास घरे-दुकाने हटवली जातील, अशी धास्ती ग्रामीण भागातील नागरिकांना वाटत आहे.

केरी – तेरेखोल, पालये, हरमल, मांद्रे, मोरजी, आगरवाडा-चोपडे, पार्से, तुये व वीरनोडा या नऊ ग्रामपंचायतींनी सभागृहात ठराव मंजूर केला आहेगावातील विद्यमान रस्ता कायम ठेवावा; २५ मीटर रुंदीकरणाची गरज नाही. गरजेइतपत हॉटमिक्स डांबरीकरण व दुरुस्ती करावी.हा ठराव मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याकडे पाठवण्यात येणार आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रीजनल प्लॅन-२०२१ मध्ये मूळ रस्ता रुंदी २५ मीटर दाखवून बदल करण्यात आला. हा बदल त्वरित रद्द करून वर्तमान रुंदीच दर्शवावी,अशी मागणी करण्यात येत आहे.याबाबत हरमलचे सामाजिक कार्यकर्ते संतोष कोरखणकर म्हणाले की , गावात सध्या असलेला रस्ता अपुरा नाही; २५ मीटर रुंदीकरणामुळे प्रत्येक कुटुंब उद्ध्वस्त होईल. सरकारने लोकहिताचा निर्णय तातडीने घ्यावा.माजी सरपंच प्रशांत (बाळा) नाईक म्हणाले की ,पहिले विश्वासात घ्या ! . रस्त्यांच्या कडेची बांधकामे राष्ट्रीय महामार्गाला जोडणारी नाहीत. आदेशाची अंमलबजावणी करण्यापूर्वी सरकारने प्रत्येक ग्रामस्थाला विश्वासात घ्यावे व संरक्षण द्यावे. असे नाईक यांनी सांगितले .

एमडीआर मार्ग आगरवाडा-चोपडेपासून मांद्रे, हरमल, पालये, केरी, तेरेखोलपर्यंत जातो. संपूर्ण पट्टा ग्रामीण असून 'एक ग्रामीण गाव ते दुसरा' असे अंतर जोडतो. डोंगरकड्यावरील व्हिला प्रकल्पांना रस्ता हवा असेल तर त्यांनी स्वतंत्र मार्ग शोधावा, गावातील रस्ता २५ मीटर करू नये, असे ग्रामस्थ ठामपणे सांगत आहेत.सार्वजनिक बांधकाम खात्याने वेळीच भूसंपादनाची प्रक्रिया केली असती तर आज रस्त्यालगत अनधिकृत बांधकामांचा प्रश्नच उद्भवला नसता, असा नागरिकांचा आरोप आहे. २५ मेच्या सभेला सर्व नऊ पंचायतींचे सरपंच-उपसरपंच, पंच सदस्य, जिल्हा पंचायत सदस्य आणि स्थानिक आमदारांनी हजेरी लावून पाठिंबा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# गोवा मानवाधिकार आयोगायचा नागरिकाला दिलासा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९** : गोवा मानवाधिकार आयोगाने फोंडा तालुक्याच्या शिरोडा येथील एका घराच्या भागाला वेगळा पाणी कनेक्शन देण्याची शिफारस केली आहे. सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी आणि त्या भागातील रहिवाशांच्या मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. आयोगाने सांगितले की, या कनेक्शनचा खर्च तक्रारदाराने करावा.

डेसमंड डि'कोस्टा आणि प्रमोद व्ही. कामत यांच्या दोन सदस्यीय आयोगाने म्हटले आहे की, गोवा सार्वजनिक आरोग्य कायदा १९८५ च्या तरतुदीनुसार पाणी व वीज पुरवठा यांसारख्या अत्यावश्यक सेवा मानवी हक्क असून मूलभूत राहणीमान राखण्यासाठी त्यांची गरज असते. शिरोडा येथील लता राजेंद्र नाईक यांनी २९ एप्रिल २०२५ रोजी तक्रार नोंदवली होती की, ज्या घरात ते आणि त्यांचे कुटुंब राहतात त्या घराच्या त्यांच्या भागाला पाणीपुरवठा नाकारण्यात आला आहे.आयोगाने तक्रारीची दखल घेत, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता ,फोंडा शिरोडा पंचायत सचिव, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी आणि कृष्णनाथ विठ्ठल नाईक (घर क्रमांक ७९२, शिरोडा) यांना नोटीस बजावली.

सर्वप्रतिवादींनी सुनावणीला हजर राहिले, पण कार्यकारी अभियंत्यावगळत इतरांनी अधिकृत उत्तर दिले नाही. तपासात समोर आले की, घर क्रमांक ७९२ या तक्रारदारांच्या सासऱ्याच्या नावावर असून संपूर्ण घरासाठी पाणी कनेक्शन कृष्णनाथ विठ्ठल नाईक यांच्या नावावर लता नाईक म्हणाल्या की, २ एप्रिल २०२५ रोजी त्यांच्या घराच्या त्यांच्या भागाचा पाणीपुरवठा थांबवण्यात आला, ज्यामुळे दैनंदिन जीवनावर विपरीत परिणाम झाला. त्यांनी स्वतंत्र पाणी कनेक्शनसाठी शिरोडा ग्रामपंचायतीकडे एनओसीसाठी अर्ज केला, पण एकाच घर क्रमांकाला एकच पाणी कनेक्शन दिले जाते, असे सांगून नकार मिळाला.

तक्रारदाराने पीडब्ल्यूडीच्या सहाय्यक अभियंत्याकडे फॉर्म-१ मध्ये घराच्या त्या भागासाठी पाणी कनेक्शनसाठी अर्ज सादर केला होता.तक्रारदार आणि प्रतिवादींचे ऐकून आयोगाने पुन्हा एकदा स्पष्ट केले की, गोवा सार्वजनिक आरोग्य कायदा १९८५ नुसार पाणी व वीज पुरवठा यांसारख्या सेवा अत्यावश्यक असून मानवी हक्क म्हणून त्यांचे संरक्षण आवश्यक आहे.

कृष्णनाथ विठ्ठल नाईक यांनी सांगितले की, जर त्यांचा मोठा भाऊ राजेंद्र नाईक यांना स्वतंत्र पाणी कनेक्शन मिळाले तर त्यांना काही आक्षेप नाही.आयोगाने तक्रार निकाली काढून पीडब्ल्यूडीला त्या घराच्या संबंधित भागाला वेगळा पाणी कनेक्शन देण्याची शिफारस केली आहे.

# साओ टोममधील रहिवाशांचा रेस्टॉरंटच्या उभारणीला विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९** : साओ टोम, येथील रहिवासी क्षेत्रात रेस्टॉरंट सुरू करण्याच्या प्रस्तावाला स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. याआधी या परिसरात ३१ रेस्टॉरंट्स कार्यरत असतानाही, नवीन प्रकल्पामुळे परिसरातील शांतता आणि सुरक्षेला धोका निर्माण होईल, अशी चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

रहिवाशांचे म्हणणे आहे की, नवीन व्यावसायिक प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषण वाढेल तसेच वाहतूक कोंडी आणि पार्किंगची समस्या अधिक तीव्र होईल. साओ टोम परिसर आधीच अरुंद रस्त्यांमुळे त्रस्त आहे. अशा परिस्थितीत आणखी एक रेस्टॉरंट सुरू झाल्यास परिस्थिति नियंत्रणाबाहेर जाईल, असे एका स्थानिक रहिवाशाने सांगितले.

संबंधित मालकाने आपली मालमत्ता एका व्यावसायिकास भाड्याने दिली असून, तो सध्या रेस्टॉरंट सुरू करण्याच्या तयारीत आहे. मात्र, स्थानिक नागरिकांनी प्रकल्पाच्या कायदेशीरतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. स्थानिक रहिवासी जॉर्ज पिंटो म्हणाले की, साओ टोममधील अनेक घरे लाकडी आहेत. अशा स्थितीत ग्राउंड प्लस वन अशा उंचीची व्यावसायिक इमारत उभारणे धोकादायक आहे. या परिसरात रस्ते अरुंद असून, बाहेर पडण्याचे पर्यायी मार्गही नाहीत. त्यामुळे आपत्कालीन सेवांसाठी, विशेषतः अग्निशमन दलासाठी हालचाल करणे अशक्यप्राय ठरते. त्यांनी यावरही लक्ष वेधले की, गेल्या दीड वर्षांपासून काम सुरू असूनही, अद्याप प्रकल्पासंदर्भातील कोणतीही अधिकृत माहिती देणारा फलक लावण्यात आलेला नाही.

या प्रकल्पामुळे त्यांच्या वैयक्तिक मालमत्तेवरही अतिक्रमण झाल्याचा आरोप एका महिला रहिवाशाने केला. हे रेस्टॉरंट माझ्या इमारतीला लागून आहे. पाण्याच्या टाकीजवळच सांडपाण्याची पाइपलाईन टाकण्यात आली आहे, जी आरोग्यास धोका निर्माण करू शकते. शिवाय पार्किंगची समस्याही दिवसेंदिवस गंभीर होत आहे, असे त्या महिलेनं सांगितले. विशेष म्हणजे, दोन वर्षांपूर्वी साओ टोम परिसराला 'नो मोटरींग झोन' म्हणून घोषित करण्यात आले होते, ज्याचा अर्थ या परिसरात आणखी व्यावसायिक प्रकल्पांना परवानगी नाकारण्यात येईल, असा अपेक्षित अर्थ होता.

दरम्यान, शुक्रवारी पणजी महानगरपालिकेच्या एका अधिकाऱ्याने सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी केली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी स्थानिक रहिवाशांना माहिती दिली की, या प्रकल्पाला अद्याप महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी मिळालेली नाही.

# काशीनाथ शेटये यांचा अतिरीक्त पदभार काढून घेतला

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १९** : मडगाव आणि विशेषतः आके येथील वीज विभागाच्या कार्यालयाजवळील बेकायदेशीर अतिक्रमणांविरोधातील आक्रमक कारवाईनंतर मडगाव येथील वीज विभागातील कार्यकारी अभियंता काशीनाथ शेट्ये यांच्याकडील अतिरीक्त कार्यभार काढून घेण्यात आला आहे .

शुक्रवारी सोशल मीडियावरुन शेट्ये यांनी स्वतः या बदलाची पुष्टी केली असून, सध्या त्यांच्या जबाबदाऱ्या सहाय्यक अभियंत्याकडे दिल्या गेल्या आहेत. शेट्ये यांनी या निर्णयाला मान्यता देत म्हणाले की , माझा पदभार सोडला जाऊ शकतो, पण बेकायदेशीर अतिक्रमणांविरुद्ध लढाई मी कायम राखेन.

शेट्ये यांनी मागील काही आठवड्यांत वीज विभागाच्या अखत्यारीतील जमिनीवरील अनधिकृत गाडे, तात्पुरते रस्त्याच्या कडेला असलेल्या स्टॉल्स आणि इतर बेकायदेशीर बांधकामांवर कडक कारवाई केली होती. खास करून आके येथील पॉवर हाऊसजवळील या अतिक्रमणांवर शासनकडून ठोस पावले उचलली गेली आहेत. जिथे वर्षानुवर्षे प्रशासनाची दुर्लक्ष झालेल्या समस्यांवर आता टोकाची कारवाई झाली आहे.

मडगाव नगर परिषदेच्या निष्क्रियतेमुळे नाराज शेट्ये यांनी न्यायालयात हस्तक्षेपाची मागणी केली होती आणि त्यांच्या कारवायांचा विस्तार अनधिकृत केबल्स काढून टाकण्यापर्यंत झाला होता, ज्यामुळे स्थानिक लोकांमध्ये आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये दोन्ही विरोधाभासी प्रतिक्रिया नोंदल्या गेल्या.

विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शेट्ये यांच्या ठाम आणि निर्भीड धोरणामुळे प्रशासकीय स्तरावर संघर्ष निर्माण झाला आणि त्याचा परिणाम म्हणून त्यांना या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमधून काढून टाकण्यात आले असावे, असा अंदाज वर्तवला जात आहे. मात्र, शेट्ये स्वतःला थोडक्याच वेळाचा अडथळा समजून पुढील लढाईसाठी सज्ज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

या घडामोडींबाबत सार्वजनिक प्रतिक्रिया दोन्ही प्रकारच्या आहेत. बरेच नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते शेट्ये यांच्या अतिक्रमणांविरुद्धच्या कडक कारवाईचे कौतुक करतात, तर काहीजण याला विभागीय नियम आणि शिस्तीचा भाग मानून पाहत आहेत.

शेट्ये यांच्या अतिरिक्त कार्यभाराच्या रिकाम्या झाल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमा, विशेषतः अनधिकृत गाडे आणि केबल काढण्याच्या उपक्रमांचा भविष्यात काय मार्ग असेल, हे पुढील काळात पाहणे महत्वाचे राहणार आहे.

# मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकाचे आव्हान

■ टीम दैनिक हेराल्ड




**पणजी, दि. १९** : गोवा सरकारने मुंबई उच्च न्यायालयाने १९७४ च्या नगर आणि कंट्री नियोजन कायद्याच्या वादग्रस्त कलम १७(२) अंतर्गत नियम आणि विनियम वाचून दाखविण्याचा आदेश दिल्यानंतर, या आदेशाला आव्हान देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात विशेष परवानगी याचिका (एसएलपी) दाखल केली आहे.

टीसीपी मंत्री विश्वजित राणे यांनी न्यायालयात दाद मागण्याची घोषणा न करता उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार नियम आणि मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदल करण्याची आणि कलम १७(२) कार्यान्वित करण्याची घोषणा केली होती. या घोषणेनंतरही सरकारने हा पुढाकार घेतला आहे, अशी सूत्रांनी माहिती दिली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती एम.एस. कर्णिक आणि न्यायमूर्ती निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने १३ मार्च २०२४ रोजी दिलेल्या आदेशात गोवा नगर आणि कंट्री नियोजन (विसंगत/अनवधानाने क्षेत्रीय नियोजन प्रस्तावांच्या दुरुस्तीसाठी प्रादेशिक योजनेत बदल/सुधारणा) नियम, २०२३ हे अल्ट्रा वायर्सअसल्याचे ठरवून रद्द केले होते.

हा निर्णय गोवा फाउंडेशन,खाजन सोसायटी ऑफ गोवा, गोवा बचाव अभियान आणि इतर अनेक जनहित याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या याचिकेच्या पार्श्वभूमीवर आला आहे. न्यायालयाने म्हटले की, विसंगत किंवा विसंगत झोनिंग प्रस्ताव या संकल्पनेचा अर्थ 'आरपी ( प्रादेशीक विकास आराखडा ) मधील दुसऱ्या प्रस्तावाच्या संदर्भात किंवा बाह्यरेखा विकास योजनेच्या संदर्भात झोनिंग प्रस्तावाची विसंगती किंवा भिन्नता' आहे, ज्यामुळे मनमानी आणि भेदभाव टाळला जावा. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत जमिनीच्या विशिष्ट तथ्यांनुसार झोनमध्ये बदल करणे शक्य नाही.

न्यायालयाने पुढे नमूद केले की, गोवा शहर आणि देश नियोजन (विसंगत/अनवधानाने झोनिंग प्रस्तावांच्या दुरुस्तीसाठी प्रादेशिक योजनेत बदल/सुधारणा) नियम, २०२३ हे संविधान आणि टीसीपी कायद्याच्या तरतुदींचा भंग करतात आणि त्यामुळे हे नियम रद्द करण्यात येत आहेत.

न्यायालयाच्या मते, नियम विसंगत झोनिंग प्रस्तावांमध्ये कधी आणि कसे सुधारणा कराव्यात हे स्पष्ट करीत नाहीत, आणि मार्गदर्शक तत्त्वांद्वारे या बाबतीत कोणतेही संकेत देत नाहीत. न्यायालयाने असेही नोंदवले की, २ जानेवारी २०२५ पर्यंत कलम १७(२) अंतर्गत २६,५४,२८६ चौरस मीटर क्षेत्रावर परिणाम करणाऱ्या ३५३ मंजुर्या या नियमांतर्गत मंजूर झाल्या आहेत.

# बागा मार्गावर मद्यपी पर्यटकाचा हैदोस

■ टीम दैनिक हेराल्ड

**कळंगुट, दि. १९** : शनिवारी पहाटे हडपडे – बागा मार्गावर एका पर्यटकाने मद्य व अंमली पदार्थांच्या नशेत वाहन चालवून अनेक वाहनांना धडक दिल्याची घटना घडली. या प्रकरणी हणजूण पोलिसांनी संबंधित पर्यटकाला ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे.

बंगळुरूहून आलेला पर्यटक भाड्याच्या वाहनातून अत्यंत वेगात हडपडे –बागा मार्गावरून जात असताना त्याने काही वाहनांना धडक दिली. त्यानंतर त्याचे वाहन विरुद्ध दिशेने येणाऱ्या पाण्याच्या टँकरवर आदळले, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. अपघातानंतर टँकरचालकाने वाहनाबाहेर येऊन त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला असता, संबंधित पर्यटक आक्रमक झाला आणि त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

घटनास्थळी जमलेल्या इतर वाहनचालकांनाही त्याने शिवीगाळ करत मारहाण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संतप्त झालेल्या काही नागरिकांनी त्याला रोखून ठेवले व दोरीने बांधले. यानंतर पोलिस व रुग्णवाहिकेला पाचारण करण्यात आले. या प्रकरणामुळे अरुंद रस्त्यावर सुमारे दीड तास वाहतूक कोंडी झाली होती. रुग्णवाहिका दाखल झाल्यानंतरही आरोपीने आरोग्य कर्मचाऱ्यांवर आणि पोलिसांवर आक्रमक वर्तन केले. अखेरीस, हणजूण पोलिसांनी त्याला ताब्यात घेत रुग्णालयात पाठवले.

या घटनेवर प्रतिक्रिया देताना साळीगावचे आमदार केदार नाईक म्हणाले की, पर्यटकांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. स्थानिक नागरिकांचा सन्मान राखणं त्यांचं कर्तव्य आहे. अशा असामाजिक वर्तनाला कोणतीही सूट देता कामा नये. या घटनेतील आरोपीवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याने अनेक वाहनांना धडक देऊन सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण केला आहे. अशा घटनांना आळा बसावा यासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत. गोमंतकीय जनतेचे जीवन अमूल्य आहे. कोणीही बाहेरून येऊन इथे गैरवर्तन करणे सहन केले जाणार नाही. आम्ही पर्यटकांचे स्वागत करतो, मात्र त्यांच्या वागणुकीत जबाबदारी आणि शिस्त आवश्यक आहे, असेही आमदार नाईक यांनी स्पष्ट केले.